# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.:०२०—२५६२११७४
२५६२११७१

शैक्षणिक विभाग,
वेबसाइट : www.unipune.ac.in
ई—मेल rr@unipune.ac.in

## परिपत्रक क्र. ९६८ /२०२१

विद्यापीठ परिपत्रक क्र. २७०/२०१३ दि. २३ डिसेंबर २०१३ नुसार दि. १ जानेवारी २०१४ पासून पदव्युत्तर शिक्षक मान्यता, एम. फिल. व पीएच.डी संशोधन मार्गदर्शक यांना विद्यापीठाची मान्यता मिळविण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया खालील वेळापत्रकाप्रमाणे राबविण्यात येत होती, तशीच ती यापुढेही चालू राहील.

(अ)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रथम सत्र | दि. १ जुलै ते दि.३१ ऑगस्ट<br>हार्ड कॉपी दि. १५ सप्टेंबरपर्यंत स्विकारली जाईल. | नियमित शुल्क<br>(रुपये)<br>२०००/— |
| २ | द्वितीय सत्र | दि. १ जानेवारी ते दि. २८/२९ फेब्रुवारी<br>हार्ड कॉपी दि. १५ मार्च पर्यंत स्विकारली जाईल. | |

उपरोक्त वेळापत्रकानुसार सर्व संबंधितांचे अर्ज स्विकारण्यात येतील. तथापि, काही अध्यापक उपरोक्त कालावधीमध्ये आपले अर्ज विद्यापीठाकडे ऑनलाईन पध्दतीने सादर करीत नाहीत अशा अध्यापकांकडून वारंवार विचारणा होत असल्यामुळे व याबाबत प्राप्त आदेशानुसार कळविण्यात येते की, यापुढे अर्ज भरण्याची मुदत उपरोक्त नमूद कालावधी व्यतिरिक्त विलंब शुल्कासहीत खालील प्रमाणे राहील.

(ब)

| अ. क्र. | अर्ज भरण्याची मुदत | | नियमित शुल्क (रुपये) | विलंब शुल्क (रुपये) | एकूण शुल्क (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथम सत्र | दि. १ सप्टेंबर ते दि. ३१ डिसेंबर अखेर | २०००/— | २०००/— | ४०००/— |
| २ | द्वितीय सत्र | दि. १ मार्च ते दि. ३० जून अखेर | | | |

Rahul ३०/६/२०२१

कृ.मा.प.

उपरोक्त **'ब'** मध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जांच्या (नियमित शुल्क + विलंब शुल्कासहीत) हार्ड कॉपी सर्व कागदपत्रासह अर्ज भरलेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत (सार्वजनिक सुट्टया सोडून) शैक्षणिक विभागाकडे जमा करणे आवश्यक आहे. सदर मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

गणेशखिंड, पुणे –४११००७ )
जा.क्र. आर.आर./993/ २०२१ )
दिनांक –30 जून, २०२१ )

(मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

प्रत:

१) मा. प्राचार्य/ मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्था.
२) मा. विभागप्रमुख/संचालक, विद्यापीठ विभाग/केंद्र

) कृपया आपल्या अधिनस्त सर्व
) अध्यापकांच्या निदर्शनास आणून द्यावे
) ही विनंती.